पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ८ फेब्रुवारी २०२५

# विवेकानंद महाविद्यालयातील आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणास प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी कक्ष व जीवन मुक्ती सेवा संस्था (व्हाईट आर्मी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना व्हाईट आर्मीचे संस्थापक अध्यक्ष अशोक रोकडे यांनी आपत्ती व्यवस्थापनाची देशाला असलेली गरज आणि त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी परंपरागत अभ्यासक्रमाव्यतिरिक्त एन.एस.एस., एन.सी.सी, स्पोर्टस्, आपत्ती व्यवस्थापन यासारख्या गोष्टींची गरज आजच्या शिक्षण व्यवस्थेत अनिवार्य असल्याचे मत व्यक्त केले. नोडल ऑफिसर डॉ. सी. बी. पाटील यांनी प्रस्ताविक केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. अभिजित कासारकर यांनी केले.

पुढारी | MY कोल्हापूर | शनिवार, ८ फेब्रुवारी २०२५

# विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कॅन्सर प्रबोधन जनजागृती रॅली

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातर्फे जागतिक कॅन्सर दिनानिमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली. बदलती जीवनशैली, बदलत चाललेला आहार व जगण्याच्या पद्धती या कॅन्सर सारख्या आजारास निमंत्रण देत आहेत. विकसित देशात कॅन्सर रुग्णांचे प्रमाण जास्त, मात्र मृत्यू दर कमी आणि भारतासारख्या देशात कॅन्सर रुग्णांचे प्रमाण कमी मात्र मृत्यूदर जास्त हे फक्त चुकीच्या जीवनशैलीमुळे होत आहे, असे मत आरंभ पॅलीएटिव्ह कॅन्सर केअर सेंटरचे प्रमुख प्रदीप काकडे यांनी व्यक्त केले. विवेकानंद महाविद्यालय ते कलेक्टर ऑफिस दरम्यान प्रबोधन काढण्यात आली. रॅलीची सांगता जिल्हाधिकारी कार्यालयात प्लास्टिक वापरावर खाण्यापिण्याच्या पदार्थामधून बंदीचा निवेदनातून झाली. रॅलीचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य आर. आर. कुंभार, आयक्यूएसी प्रमुख डॉ. श्रुती जोशी, ज्युनिअर आर्टस् कॉमर्स विभाग प्रमुख प्रा. शिल्पा भोसले, मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा प्रा. यू. एच. तिजाईकर, प्रा. पी. वाय. राठोड, प्रा. पी. आर. बागडे, प्रबंधक रघुनाथ जोग यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. जिल्हाधिकारी कार्यालयात काजल टोपले या ब्लड कॅन्सरवर मात केलेल्या मुलीचा विशेष सत्कार करण्यात आला.

08/02/2025

8/2/2025

तरुण भारत संवाद

शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५

# चेस टूर्नामेंटसाठी ऋषिकेशची निवड

## पश्चिम विभागीय संघातून करणार प्रतिनिधीत्व

प्रतिनिधी

कोल्हापूर

नेरुळ (नवी मुंबई) येथे १७ फेब्रुवारी रोजीपासून आयोजित केल्या जात असलेल्या कोल्हापुरातील आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू ऋषिकेश कबनूरकर याची एसओजी ग्रॅण्डमास्टर सिरीज झोनल फायनल चेस टुर्नामेंटसाठी पश्चिम विभागीय संघात निवड करण्यात आली.



अलीकडेच पश्चिम भारत विभाग बुद्धिबळ स्पर्धेचे ऑनलाईन स्वरुपात आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्र, गोवा, गुजरात, दिव, दमण, नगर-हवेली येथील १५० वर बुद्धिबळपटू सहभागी झाले होते.

या स्पर्धेत महाराष्ट्रातर्फे प्रतिनिधीत्व केलेल्या ऋषिकेशने साडे सात गुण मिळवून दहावा क्रमांक मिळवला. या कामगिरीमुळे त्याची नेरुळ येथे होणाऱ्या एसओजी सिरीज टुर्नामेंटसाठी पश्चिम विभागीय संघात निवड करण्यात आली. दरम्यान, या शानदार कामगिरीमुळे त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

ऋषीकेशसह अन्य १५ बुद्धिबळपटूंचीही त्यांच्या विभागांमार्फत टुर्नामेंटसाठी निवड केली आहे. टुर्नामेंटमध्ये यशस्वी होणाऱ्या बुद्धिबळपटूंना लर्नेशनल टुर्नामेंटसाठी पात्र ठरवले जाणार आहे. ऋषिकेश हा विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी असून त्याला प्रशिक्षण कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.